सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत,आरोग्य सेवा आयुक्तालय यांचे अखत्यारीतील गट-क व ड संवर्गातील सरळसेवा भरती २०२३

दिनांक ०४.०१.२०२४

## प्रसिध्दीपत्रक

**विषय - कागदपत्र तपासणी.**

आरोग्य सेवा आयुक्तालय अंतर्गत गट-क व ड संवर्गातील परीक्षा राज्यातील २९ जिल्हयामध्ये १०८ परीक्षा केंद्रामध्ये दिनांक ३०/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ व दिनांक १२/१२/२०२३ या तारखांना आयोजित करण्यात आलेली होती. परिक्षा झाल्यानंतर मे. टि.सी.एस.-आय.ओ.एन. यांचेकडून दि.१५-१२-२०२३ पासून संबंधित उमेदवाराच्या लॉगिन आय.डी. वर त्या उमेदवाराने सोडवलेली उत्तर पत्रिका (Answer Sheet) व उत्तर तालिका (Answer Key) उपलब्ध करुन देण्यात आली होती. उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उत्तर तालिका (Answer Key) च्या अनुषंगाने चुकीचे प्रश्न, प्रश्नांचे चुकीचे पर्याय व चुकीच्या उत्तरास गुणदान वगैरे संबंधित आक्षेप / हरकत असल्यास सदर आक्षेप नोंदविण्यासाठी दि.१८-१२-२०२३ ते दि.२०-१२-२०२३ या कालावधीत टि.सी.एस. कडून लिंक खुली करून देण्यात आली होती.

सदर प्राप्त आक्षेपांबाबत टीसीएस कंपनीच्या समितीमार्फत कार्यवाही करणेत येऊन ज्या पदाच्या परीक्षेबाबत घेण्यात आलेले आक्षेप / हरकत समितीमार्फत स्विकृत झालेत त्या पदांच्या अंतिम ( Answer Key ) उत्तर तालिका संबंधित उमेदवारांच्या ( Log in ) लॉग इन मध्ये उपलब्ध करण्यात येणार आहे.

यापुर्वीच प्रसिध्द केल्यानुसार आक्षेप निराकरणानंतर ज्या संवर्गाची परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रामध्ये झाली आहे त्या संवर्गासाठी Normalization सूत्रानुसार अंतिम गुण निदान होईल व त्यानुसार गुणवत्ता यादी प्रसिध्द होईल.

त्यानंतर कार्यालयनिहाय व पदनिहाय गुणवत्ता यादी व निवड यादी प्रसिध्द करण्याची कार्यवाही येईल.

गुणवत्तेने निवड यादीत स्थान मिळविणा-या सर्व संबधित उमेदवारांना याव्दारे आगाऊ सूचित करण्यात येते की, त्यांनी कागदपत्रे तपासणीकरिता सोबतच्या तक्त्यातील शैक्षणिक अर्हतेचे व इतर आवश्यक कागदपत्रे मुळ प्रतीसह साक्षांकिंत प्रती तयार करुन ठेवाव्यात.

उमेदवारांची आवश्यकतेनुसार Bio-metric verification करण्यात येईल.

हंगामी फवारणी कर्मचा-यांचे केवळ शासन निकषानुसार देण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यात येईल.

कागदपत्र तपासणी जिल्हा/विभाग स्तरावर पडताळणी प्रक्रिया करण्यात येईल.

उमेदवारांचा व शासनाचा अनावश्यक कालापव्यय टाळण्यासाठी या आगाऊ सूचना सर्व उमेदवारांसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. जाहिरातीमधील नमूद अटी व शर्ती तसेच प्रचलित शासन निर्णयाव्दारे सर्व उमेदवारांची कागदपत्रे तपासणी व त्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल.

ज्या उमेदवारांकडे खालील कागदपत्रांपैकी एखादे प्रमाणपत्र उदा.अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सदरील कागदपत्रे नियुक्तीपासून ०१ महिन्यात सादर करण्यात येईल अन्यथा संबंधित उमेदवाराची नियुक्ती आदेश रदद करण्यात येईल तसेच सादर केलेले कोणतेही शैक्षणिक, आरक्षण, अनुभव कागदपत्रे बोगस/बनावट आढळून आल्यास झालेली नियुक्ती आदेश रदद करण्यात येईल. या आशयाचे प्रतिज्ञापत्र कागदपत्रे तपासणीवेळी उमेदवाराने सादर करावयाचे आहे. कोणतेही शैक्षणिक, जात किंवा अनुभव प्रमाणपत्र कोणत्याही स्तरावर खोटे किंवा बनावट आढळल्यास संबंधित नियुक्ती धारकाची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व शासन सेवेसाठी कायमचे अपात्र करून फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येईल.

# कागदपत्रे तपासणी

उमेदवाराचे नाव- ........................................................................................................

पदनाम- ....................................... अर्ज क्र.................. बैठक .................................

| अ.क्र. | प्रमाणपत्राचे नांव | सादर केलेले प्रमाणपत्र |
|---|---|---|
| १ | जन्म तारखेचे प्रमाणपत्र (जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला/शांलात परीक्षा प्रमाणपत्र) | |
| २ | जात प्रमाणपत्र (जातीचा तपशील) | जात प्रवर्ग :- |

| | | |
|---|---|---|
| | | पोटजात-<br>प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक- |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र (प्राधिकाऱ्याचे पदनाम व ठिकाण) (प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक) | पडताळणी समितीचे नांव :-<br>प्रमाणपत्र क्र. .............. दि................ |
| ४ | जहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र | प्रमाणपत्र क्रमांक - ...................<br>दिनांक - ................................<br>वैधता कालावधी -...................... |
| ५ | अधिवास प्रमाणपत्र (प्राधिकाऱ्याचे पदनाम व ठिकाण) | |
| ६ | जाहिरातील नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | १.एसएससी- |
| | | २.एचएससी- |
| | | ३.पदवी/पदविका- |
| | | ४.पदव्युत्तर पदविका/पदवी- |
| | | ५.इतर- |
| ७ | अनुभवाचे प्रमाणपत्र - जाहिरातीत ज्या पदांकरिता अनुभव आवश्यक असल्यास त्याचा तपशील | पदाचे नाव-<br>कालावधी-<br>संस्थेचे नाव-<br>संस्था (शासकीय/निमशासकीय/खाजगी)<br>मासिक वेतन- |
| ८ | रजिस्टेशन (नर्सिंग कौन्सिल, फार्मसी कॉन्सिल, डेन्टल कौन्सिल,ऑक्यूपेशनल व फिजिओथेरपी कॉन्सिल) कडील नोंदणी प्रमाणपत्र. | नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक-<br>दिनांक-<br>कालावधी- .................. ते ................... |
| ९ | मान्यता प्राप्त संस्थेचे संगणक अर्हता प्रमाणपत्र- एमएस-सीआयटी अथवा तत्सम) | |
| १० | **समातंर आरक्षण धारकांसाठी-**<br>अंशकालीन/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/ खेळाडू/माजी सैनिक/दिव्यांग/अनाथ या पैकी असल्यास जाहिरातीत नमूद केल्या प्रमाणे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांचे अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र) (प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त | प्रमाणपत्र क्र................. दि......................<br>निर्गम प्राधिकाऱ्याचे नाव -.........................<br>......................................................... |

| | | |
|---|---|---|
| | उमेदवारांसाठी जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे स्वाक्षरी व नामनिर्देषित केलेले प्रमाणपत्र) (खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरा वरील खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावे.) (माजी सैनिक उमेदवारांसाठी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व डिस्चार्ज बुक) | |
| ११ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | |
| १२ | अर्जात नमूद केलेल्या पत्यावर रहात असल्याबाबतचा पुरावा | |
| १३ | स्वतःचा फोटो असलेले ओळख पत्र. (आधार कार्ड आवश्यक) | आधारकार्ड/ पॅनकार्ड / वाहन चालविण्याचा परवाना/शासकीय ओळखपत्र/बँकेचे पासबूक /निवडणूक आयोगाचा ओळखपत्र |
| १४ | स्वतःचे पासपोर्ट साईज दोन फोटो | |
| १५ | नाव बदलले असल्यास त्याबाबतचे गॅझेट किंवा विवाहामुळे नाव बदलले असल्यास विवाह प्रमाणपत्र | |